# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे यांचे कार्यालय

पत्ता : १, जिल्हा निवडणूक शाखा, तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे, (प)-४०० ६०१.
दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५३४ २१२५, फॅक्सनं :- ०२२-२५४५४१४२

WEBSITE - WWW.THANEELECTION.COM


---

क्र. निवडणूक/ कक्ष-१/टे-३/कावि- ७०/ २०२३
दि. ०३ /०८ /२०२३

प्रति,

१.उपायुक्त, (निवडणूक) ठाणे महानगरपालिका,
२.उपायुक्त, (निवडणूक) नवी मुंबई महानगरपालिका,
३.उपायुक्त (निवडणूक) कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
४.उपायुक्त (निवडणूक) उल्हासनगर महानगरपालिका,
५.उपायुक्त (निवडणूक) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,
६.उपायुक्त (निवडणूक) मिरा भाईंदर महानगरपालिका,
७.उपमुख्याधिकारी, कुळगाव बदलापूर नगरपरिषद
८.उपमुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद

विषय :- 'अभिव्यक्ती मताची' या स्पर्धेची प्रचार व प्रसिद्धी करण्याबाबत.

संदर्भ :- मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, यांचेकडिल पत्र क्र.संकीर्ण २०२३ /प्र.क्र.३९९/२३/३३ दि.०१ ऑगस्ट,२०२३

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्र व सहपत्रे सोबत जोडली आहेत. स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध माध्यमांद्वारे नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी Voter's Awareness Program अंतर्गत **' Voice of Vote'** ही स्पर्धा आयोजित करणेबाबत कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने आपले महानगरपालिका क्षेत्रात सदर स्पर्धेची जास्तीत जास्त प्रसिध्दी करावी. जेणेकरून मोठ्या संख्येने नागरिक या स्पर्धेत सहभागी होतील असे पाहावे.

तसेच वर्तमानपत्रासह विविध प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमांवर या स्पर्धेची अधिकाधिक प्रसिध्दी करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
सोबत:- सहपत्र व प्रसिद्धीपत्रक.

AKadam

(अर्चना कदम)
उपजिल्हा निवडणूक अधिकारी,ठाणे

प्रत :- श्रीम स्मिता मोहिते,तहसिलदार(SRA) तथा जिल्हा समन्वय अधिकारी (SVEEP) यांना माहितीसाठी.

कावि ७०

# मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.३९९/२३/३३,
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२,
दिनांक :- ०१ ऑगस्ट, २०२३.

प्रति,
जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

विषय :- 'अभिव्यक्ती मताची' या स्पर्धेची प्रचार व प्रसिद्धी करण्याबाबत.

महोदय / महोदया,

स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध माध्यमाद्वारे नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येते. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी Voter's Awareness Program अंतर्गत 'Voice of Vote' ही स्पर्धा या कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे. सदर स्पर्धेची व्यापक प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक आहे. यानुषंगाने सदर स्पर्धेचे प्रसिद्धीपत्रक सोबत जोडून पाठवित आहे. कृपया त्यास विविध माध्यमाद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी, ही विनंती.

आपला,

S.Dalvi

( शरद दळवी )
अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत :- उप जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व

## प्रसिद्धीपत्रक

## 'अभिव्यक्ती मताची' स्पर्धेचे आयोजन

विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेचा मतदार जागृतीसाठी उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे 'अभिव्यक्ती मताची' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'अभिव्यक्ती मताची' या विषयांतर्गत जाहिरातनिर्मिती, भित्तिपत्रक (पोस्टर) आणि घोषवाक्य या तीन स्पर्धा आयोजित केल्या आहेत. या स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या (मास मीडिया व जर्नलिजम) महाविद्यालये आणि सर्जनशील कलाशिक्षण महाविद्यालये (ART COLLEGS) येथील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. स्पर्धेचा कालावधी ०१ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२३ हा आहे. तीनही स्पर्धांचे विषय आणि नियमावल्या 'मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र' या संकेतस्थळावर उपलब्ध देण्यात आलेले आहे.

सदर स्पर्धांचे विषय पुढीलप्रमाणे आहेत : (१) युवा वर्ग आणि मताधिकारी, (२) मताधिकार लोकशाहीचा स्तंभ, (३) एका मताचे सामर्थ्य, (४) सक्षम लोकशाहीतील मतदाराची भूमिका / जबाबदारी, (५) लोकशाहीतील सर्वसमावेशकता आणि मताधिकार. तीनही स्पर्धांचे माध्यम मराठी, हिंदी आणि इंग्रजी आहे.

सदर स्पर्धांसाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आलेली आहेत. या बक्षिसांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे : जाहिरातनिर्मिती स्पर्धेसाठी पहिले पारितोषिक रु. १,००,००० रु., दुसरे पारितोषिक ७५,०००, तिसरे पारितोषिक ५०,००० रु. आणि दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १०,००० रुपयांची आहेत. भित्तिपत्रक (पोस्टर) स्पर्धेसाठी पहिले पारितोषिक ५०,००० रु., दुसरे पारितोषिक २५,००० रु. आणि तिसरे पारितोषिक १०,००० रु. आणि दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ५,००० रुपयांची आहेत. घोषवाक्य स्पर्धेसाठी पहिले पारितोषिक २५,००० रु., दुसरे पारितोषिक १५,००० रु., तिसरे पारितोषिक १०,००० रु. आणि दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ५,००० रुपयांची आहेत.

मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी महाराष्ट्रातील जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या आणि सर्जनशील कलाशिक्षण महाविद्यालयांच्या अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सदर स्पर्धांमध्ये भाग घ्यावा असे आवाहन केले आहे.

*****